महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

## दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा -२०२४

**क्रमांक : सीएमए-४०२३/प्र.क्र.१६०/२०२३/जाहिरात** **जाहिरात क्रमांक: ०१३/२०२६**

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग संवर्गातील **२८६** पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **रविवार दिनांक ०२ ऑगस्ट, २०२६** रोजी **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पूर्व परीक्षा २०२४ छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर, नवी मुंबई व नागपूर** या जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करण्याचा कालावधी** | **दिनांक ०१ मे, २०२६ रोजी १४.०० ते दिनांक २१ मे , २०२६ रोजी २३:५९ पर्यन्त** |
| २ | **ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २१ मे, २०२६ रोजी २३:५९ पर्यन्त** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक २३ मे, २०२६ रोजी २३:५९ पर्यन्त** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २५ मे, २०२६ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

३. पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुख्य परीक्षेचा दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

४. पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील व अशा सुधारित/अतिरिक्त मागणीपत्रांचा तपशील मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

**५. पदसंख्या व सामाजिक आरक्षणाच्या अनुषंगाने वयोमर्यादा, गुण आणि शुल्कामध्ये सवलतीच्या अनुषंगाने तरतूदी :-**

**५.१** भरावयाच्या उपरोक्त पदांचा तपशील शासनाच्या मागणीपत्रानुसार आहे. तसेच वर नमूद पदसंख्येमध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**५.२** शासनाकडून पदसंख्यामध्ये बदल प्राप्त झाल्यास याबाबतची माहिती/बदल वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर शुद्धिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**५.३** अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

**५.४** सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथिल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येतील. त्या अनुषंगाने आयोगामार्फत दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले प्रसिद्धीपत्रक जाहिरातीस लागू राहतील.

**५.५** सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय (SEBC) उमेदवारांसाठी वयोमर्यादा, गुण आणि फीमध्ये दिली जाणारी सवलत ही मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक ३०/२०२४ (श्री. भाऊसाहेब भुजंगराव पवार विरुद्ध महाराष्ट्र शासन) आणि त्यासंदर्भातील इतर संबंधित न्यायिक प्रकारणाच्या अधीन राहून लागू राहील.

**५.६** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक २८ जून, २०२४ व ०५ जुलै, २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**५.७** मा. उच्च न्यायालयाकडून दिनांक १९ डिसेंबर, २०१९ व दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांना मागासवर्गीय उमेदवारांकरीता अनुज्ञेय असलेले कोणतेही फायदे/सवलती देय नाहीत, असे कळविण्यात आले आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**५.८** शासन शुद्धिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी **सन २०२६-२०२७** या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

**५.९** कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

**५.१०** सामाजिक आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**६. दिव्यांग उमेदवारांबाबत तरतुदी आणि सोयी सवलती :-**

**६.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २(आर) मधील व्याख्येनुसार लक्षणीय (Benchmark) दिव्यांगत्व असलेल्या तसेच कलम २(एस) मधील व्याख्येनुसार दिव्यांगत्व असलेल्या ज्या व्यक्तींना लिखाण करताना अडचणी/मर्यादा येतात, त्याचप्रमाणे ज्यांची लेखनाची गती कमी असते अशा दिव्यांग व्यक्तींची इच्छा असल्यास ते लेखनिक/वाचक या सवलतीस पात्र ठरतील.

**६.२** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**६.३** शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या / येणाऱ्या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करुन घेण्यासाठी नोंदणी केल्यानंतर प्रत्यक्षात सदर ओळखपत्र प्राप्त होईपर्यन्तच्या कालावधीसाठी दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्वाच्या सवलती / योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांचेकडे असलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्रासोबत वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrollment Number) सादर करणे अनिवार्य राहील.

**६.४** महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त नमूद दिनांक २७ जून, २०२४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे दिव्यांग व्यक्तींना सर्व सुविधा व लाभ मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) आयोगाद्वारे आयोजित सर्व पदभरतीकरीता अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबत दिनांक २१ एप्रिल, २०२४ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**६.५** सदर शासन परिपत्रकास अनुसरुन आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या खात्यामध्ये दिव्यांग उमेदवारांचा वैश्विक ओळखपत्र क्रमांक नोंद करण्याची तसेच दिव्यांग उमेदवारांनी त्यांच्या खात्यामध्ये दिलेला दिव्यांगत्वाचा तपशील केंद्र शासनाच्या स्वावलंबन पोर्टलवरुन विधिग्राह्य (Validate) करुन घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**६.६ दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याकरीता दिव्यांग उमेदवारांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असेल :-**

(१) स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र क्रमांक अशा दोन्ही बाबी उपलब्ध असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी सदर दोन्ही तपशील नोंदविणे आवश्यक आहे.

(२) ज्या उमेदवारांकडे सद्यस्थितीत स्वावलंबन पोर्टलवरुन वितरित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र नाही. तथापि, राज्य शासनाच्या SADM पोर्टलवरुन वितरित करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र आहे, अशा उमेदवारांनी SADM प्रमाणपत्रासह वैश्विक ओळखपत्रासाठी नोंदणी केल्याचा क्रमांक (Enrolment Number) नोंदविणे अनिवार्य असेल. तथापि, सदर उमेदवारांना मुलाखतीपूर्वी वैश्विक ओळखपत्र सादर करणे आवश्यक असेल.

(३) उमेदवारांनी खात्यामधील दिव्यांगत्वाचा सर्व आवश्यक तपशील अचूकपणे नोंदवावा. दिव्यांगत्वाचा तपशील नोंदविताना तो दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्रावर नमूद केल्याप्रमाणेच असल्याची खात्री करावी. उदा. दिव्यांग प्रमाणपत्र क्रमांक, दिव्यांगत्वाची टक्केवारी, वैश्विक ओळखपत्र क्रमांक, वैश्विक ओळखपत्र वितरणाचा दिनांक इत्यादी तपशील वैश्विक ओळखपत्राप्रमाणेच असणे आवश्यक आहे.

(४) दिव्यांगत्वाचा सर्व तपशील अचूकपणे नोंदविल्यानंतर 'Validate' या बटनवर क्लिक करावे.

(५) उमेदवाराचे वैश्विक ओळखपत्रावर नमूद नाव, दिव्यांगत्वाचा प्रकार व दिव्यांग स्थिती (कायमस्वरुपी/तात्पुरते) इत्यादी तपशील दर्शविले जाईल व सदर तपशील अचूक असल्याचे उमेदवाराने संबंधित बटनवर क्लिक करुन प्रमाणित केल्यानंतर दिव्यांग तपशील विधिग्राह्य करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(६) दिव्यांग तपशील विधिग्राह्य होण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होण्यासाठी उमेदवाराच्या खात्यामध्ये नमूद जन्मदिनांक व वैश्विक ओळखपत्राकरीता नमूद जन्मदिनांक एकच असणे तसेच दिव्यांगत्वाचा सर्व तपशील अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

**६.७ दिव्यांग तपशील विधिग्राह्य असल्याशिवाय दिव्यांग उमेदवारांना कोणत्याही जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करता येणार नाही.**

**६.८** दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

**६.९ दिव्यांग उमेदवार :- लेखनिक आणि / अथवा अनुग्रह कालावधीबाबत**

**६.९.१** दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक: दिव्यांग२०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ अन्वये जारी करण्यात आलेल्या तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**६.९.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**६.९.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**६.९.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**६.९.५** परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

**६.९.६** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या "दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना" चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

**७. पात्रता :-**

**७.१** भारतीय नागरिकत्व

७.२ वयोमर्यादा, अर्हता, अनुभव, इत्यादी :-

| अ. क्र. | पात्र प्रवर्ग | दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी वय | | | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | | | |
| | | अमागास/ आदुघ/ अनाथ/ मागासवर्गीय/दिव्यांग | अमागास/ आदुघ /अनाथ | मागास वर्गीय/ दिव्यांग | | |
| १ | Advocate / Public Procecutor / Government Advocate | 21 | 35 | 40 | Degree in Law | (i) Must have practiced as an Advocate in the High Court of Bombay or Courts subordinate thereto for not less than **3 years on 30th April, 2026** and while computing the period for practicing as an Advocate, the period during which the candidate has worked as a Law Clerk (after provisional enrolment or registration as an Advocate) with any of the Judges of the High Court of Bombay or Judicial Officers of the Courts subordinate to the High Court of Bombay shall be included.<br>(ii) Practice as an Advocate shall be reckoned from the date of provisional enrollment or registration as an Advocate with the State Bar Council; or<br>(iii) Must be working or must have worked as Public Prosecutor or Government Advocate for not less than **3 years** in the post or posts as on **30th April, 2026**. In computing the period of three years, the period during which the candidate has worked as an Advocate shall also be included.” |
| **OR** | | | | | | |
| २ | Ministerial Staff -<br>(*i*) of High Court of Bombay or Courts subordinate thereto<br>(*ii*) of Offices of the Government Pleaders attached to those Courts;<br>(*iii*) working as Legal Assistant and above in the Legal Section of Law and Judiciary Department in Mantralaya, provided such employee | 21 | 45 | 50 | Degree in Law | Minimum **3 years** of service as on **30th April, 2026** after obtaining Degree in Law. |

**७.३ मराठी भाषेचे ज्ञान :-**

**७.३.१** सर्व उमेदवारांना मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता व लिहिता येणे आवश्यक असून मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान, त्याचप्रमाणे मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

**७.३.२** मुलाखतीच्या वेळी मराठी भाषेच्या ज्ञानाबददल खालील सक्षम प्राधिका-याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

**(i) वकील (Advocate) किंवा अधिवक्ता (Attorny) - मा. उच्च न्यायालयाचे प्रबंधक (न्यायिक) किंवा** उमेदवार ज्या ठिकाणी वकिली व्यवसाय करीत असेल किंवा ज्या अधिकारक्षेत्रात तो/ती सामान्यतः वास्तव्यास आहे, त्या ठिकाणच्या संबंधित जिल्ह्याचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्याकडून प्रमाणित केलेले.

**(ii)** सेवा कर्मचारी - संबंधित उमेदवार ज्या कार्यालयात कार्यरत आहे त्या कार्यालयाच्या विभाग प्रमुख/ कार्यालयाच्या प्रमुखांकडून.

**७.३.३** मराठी भाषेविषयीची अर्हता धारण न करणा-या उमेदवारांच्या बाबतीत शासन नियमानुसार **नियुक्तीपासून दोन वर्षाच्या** आत मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक.

**७.४ अनुभवाचा पुरावा :-**

मुलाखतीच्या वेळी अनुभवाबाबत खालील सक्षम प्राधिका-याने विहित नमुन्यात प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे :-

**(१) अनुभवाच्या पुराव्या पृष्ठयर्थ संबंधित जिल्ह्याचे प्रधान जिल्हा न्यायाधीश किंवा उमेदवार ज्या ठिकाणी प्रॅक्टिस करीत आहे किंवा केली आहे त्या ठिकाणचे प्रधान न्यायिक अधिकारी यांच्याकडून प्रमाणित केलेले असावे; किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वकिली व्यवसाय करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत किमान दहा वर्षांचा अनुभव असलेल्या वकिलाकडून, प्रबंधक (न्यायिक) / विशेष कार्य अधिकारी यांच्या अनुमोदनासह (endorsement) प्रमाणित केलेले असावे**

(२) सेवा कर्मचाऱ्यांबाबत - ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवा आहे, असा विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

(३) विधी लिपिकाच्या (Law Clerk) बाबतीत - संबंधित न्यायालयाचे **प्रबंधक** (Registrar) यांच्याकडून.

**७.५ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक:-**

**७.५.१ State Bar Council मध्ये** वकील म्हणून तात्पुरती नोंदणी **(Provisional enrolment)** किंवा नोंदणीच्या **(Registration)** तारखेपासून वकिलीचा व्यवसाय गणला जाईल.

**७.५.२** जाहिरातीच्या दिनांकास म्हणजे **दिनांक ३० एप्रिल, २०२६** रोजी संपादन केलेली शैक्षणिक व इतर अर्हता तसेच अनुभव पात्रता पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल.

**७.६ अनुभवाच्या दाव्यांबाबत: -**

आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विविध स्वरुपाचे दावे करताना अथवा दावे अद्ययावत करताना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अनुभवाच्या दाव्यांनुसार पात्र होण्यासाठी उमेदवाराने **Nature of Job - Advocate / Govt. Advocate / Public Prosecutor** किंवा **Ministerial Staff** असे नमूद करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय, ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज स्वीकृत होऊ शकणार नाही.

**७.७ प्रमाणपत्राचे विहित नमुने :-**

**७.७.१** मराठी भाषेच्या ज्ञानाबाबत तसेच अनुभव प्रमाणपत्राचे विहित नमुने आयोगाच्या संकेतस्थळावर DOWNLOADS या सदरामध्ये उपलब्ध आहेत.

**७.७.२** वकिलांच्या बाबतीत मराठी भाषेचे ज्ञान - उमेदवार ज्या ठिकाणी प्रॅक्टिस करीत आहे किंवा केली आहे किंवा वास्तव्यास आहे, त्या संबंधित जिल्ह्याचे प्रधान जिल्हा न्यायाधीश किंवा त्या ठिकाणचे प्रधान न्यायिक अधिकारी यांच्याकडून प्रमाणित केलेले असावे; किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वकिली व्यवसाय करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत किमान दहा वर्षांचा अनुभव असलेल्या वकिलाकडून, निबंधक (न्यायिक) / विशेष कार्य अधिकारी यांच्या अनुमोदनासह (endorsement) प्रमाणित केलेला असावा.

**७.७.३** आयोगाकडून वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार विहित नमुन्यातच अर्हता/पात्रतेसंदर्भात प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**८. निवड प्रक्रिया :-**

**८.१** संपूर्ण भरती प्रक्रिया महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम, २००८ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या/येणाऱ्या सुधारणांसह, मा. उच्च न्यायालय किंवा माननीय मुख्य न्यायमूर्ती यांनी वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशांनुसार तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीनुसार राबविण्यात येईल. मात्र, आयोगाची कार्यनियमावली ही महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम २००८ किंवा मा. उच्च न्यायालय किंवा मा. मुख्य न्यायमूर्ती यांनी दिलेल्या निर्देशाशी विसंगत ठरत असल्यास, त्यावेळी महाराष्ट्र न्यायिक सेवा नियम २००८ व निर्देश हे प्रमाण समजण्यात येईल.

**८.२** पात्रतेसंदर्भात विहित अर्हता, अनुभव तसेच इत्यादी बाबी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखत अथवा निवडीसाठी पात्र असणार नाही.

**८.३** आयोगाने त्या त्या वेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार उमेदवार मुलाखत अथवा निवडीसाठी पात्र असल्यासच त्याचा मुलाखत अथवा निवडीसाठी विचार करण्यात येईल.

**९. संवर्ग / पदाबाबत सर्वसाधारण तपशील :-**

**९.१ वेतनश्रेणी** :- (१) **वेतनमॅट्रीक्स मधील स्तर जे-१** रुपये :- **७७८४०/-** अधिक नियमानुसार देय इतर भत्ते.
(२) वेतनश्रेणीमध्ये शासनाच्या धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**९.२ कर्तव्ये व जबाबदाऱ्या**:- प्रस्तुत संवर्ग / पदाच्या कर्तव्य व जबाबदा-या याबाबतचा संक्षिप्त तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१०. परीक्षेचे टप्पे -**

**१०.१** प्रस्तुत परीक्षा खालील तीन टप्प्यात घेण्यात येईल :-

(१) पूर्व परीक्षा - १०० गुण
(२) मुख्य परीक्षा - २०० गुण
(३) मुलाखत - ५० गुण

**१०.२** पूर्व व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा योजना इत्यादी संदर्भातील तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१०.३ पूर्व परीक्षा** :-

**१०.३.१** परीक्षेचे स्वरुप :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी, प्रश्नपत्रिका-एक.

**१०.३.२** एकूण गुण - **१००**

**१०.३.३** परीक्षेचे माध्यम- इंग्रजी

**१०.३.४ पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम :-**

**(1) Code of Criminal Procedure, (2) Civil Procedure Code, (3) Evidence Act, (4) Transfer of Property Act, (5) Specific Relief Act, (6) Maharashtra Rent Control Act, (7) Limitation Act, (8) Constitution of India, (9i) Indian Penal Code, (10) Law of Contracts, The Sale of Goods Act and Partnership Act, (11) Bhartiya Nyaya Sanhita, 2023, (12) Bhartiya Sakshya Adhiniyam, 2023, (13) Bhartiya Nagrik Surksha Sanhita, 2023 (BNSS)**

**१०.३.५ पूर्व परीक्षेचा निकाल :-**

(i) उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी आयोगामार्फत वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची पूर्व परीक्षा घेण्यात येईल. प्रस्तुत पूर्व परीक्षेचा निकाल संगणकाद्वारे आधारित पद्धतीने तयार करण्यात येईल. पूर्व परीक्षेच्या निकालाद्वारे आयोगाने निश्चित केलेल्या सीमांकन रेषेप्रमाणे मुख्य परीक्षेस प्रवेशासाठीचे विज्ञापित पदांच्या १:१० गुणोत्तर राखण्यासाठी अशा सर्व उमेदवारांना मुख्य लेखी परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

(ii) आयोगाने निश्चित केलेल्या गुणांच्या सीमांकन रेषेइतकेच गुण एकापेक्षा अधिक उमेदवारांनी मिळविले असल्यास, अशा सर्व उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

**स्पष्टीकरण:-** एखादा उमेदवार दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सवंर्गासाठी सुरू असलेल्या कोणत्याही मागील निवड प्रक्रियेत, मुख्य परीक्षा किंवा मुलाखत अथवा निवड यादीत समाविष्ट असेल आणि तोच उमेदवार चालू भरतीप्रक्रियेमध्येही पात्र ठरत असेल, तर चालू भरतीप्रक्रियेमध्ये मुख्य परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या, अशा सामाईक (common) उमेदवारांच्या संख्येइतकी वाढविण्यात येईल.

**१०.३.६ पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच ते उमेदवारांनाही कळविले जाणार नाहीत.**

**१०.४ मुख्य परीक्षा** :-

**१०.४.१** परीक्षेचे स्वरुप :- पारंपरिक

**१०.४.२** एकूण गुण. **२००**

**१०.४.३** प्रश्नपत्रिका - दोन. प्रत्येकी **१००** गुणांचे दोन पेपर

**१०.४.४** परीक्षेचे माध्यम - मराठी व इंग्रजी

**१०.४.५ मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम :-**

**(अ) पेपर क्रमांक १ :- (1) Civil Procedure Code, (2) Transfer of Property Act, (3) Specific Relief Act, (4) Law of Contracts, Sale of Goods Act and Partnership Act.**

(ब) पेपर क्रमांक २:- **(1) Indian Penal Code, (2) Evidence Act, (3) Code of Criminal Procedure, (4) Scheduled Castes & Scheduled Tribes (Prevention of Atrocities) Act-1989 And Protection of Civil Rights Act-1955, (5) Essay on Current Legal topic (Approximately 800 Words), (6) The Bharatiya Nyaya Sanhita, 2023, (7) Bharatiya Sakshya Adhiniyam, 2023, (8) The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita 2023, (BNSS)**

**१०.५ मुख्य परीक्षेचा निकाल :-**

**१०.५.१** दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग संवर्गाच्या ५० गुणमर्यादा असलेल्या मुलाखतीस बोलविण्यासाठी पात्र होण्याकरीता उमेदवारास मुख्य परीक्षेमध्ये प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये किमान ५० गुण मिळविणे आवश्यक राहील .

**१०.५.२** मागास प्रवर्गातील अथवा दिव्यांग उमेदवारांनी वरीलप्रमाणे मुलाखतीस पात्र होण्यासाठी किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.

**१०.५.३** यशस्वी उमेदवारांना प्रस्तुत जाहिरातीमधून विज्ञापित केलेल्या पदांच्या १:३ या गुणोत्तर प्रमाणात मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल

**१०.५.४** आयोगाने निश्चित केलेल्या गुणांच्या सीमांकन रेषेएवढे (Cut-off) गुण मिळविलेले एकापेक्षा जास्त उमेदवार असल्यास, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीस बोलाविण्यात येईल.

**१०.५.५** दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सवंर्गासाठी सुरू असलेल्या कोणत्याही मागील निवड प्रक्रियेत, मुख्य परीक्षा किंवा मुलाखत अथवा निवड यादीत समाविष्ट असेलेले आणि तेच उमेदवार चालू भरतीप्रक्रियेमध्येही पात्र ठरत असतील, तर चालू भरतीप्रक्रियेमध्ये मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची संख्या, अशा सामाईक (common) उमेदवारांच्या संख्येइतकी वाढविण्यात येईल.

**१०.६ मुलाखत - ५० गुण :-**

**१०.६.१** मुलाखतीत किमान **४० %** अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच फक्त अंतिम निवडीसाठी विचार केला जाईल.

**१०.६.२** दिव्यांग व्यक्तिंच्याबाबतीत **३५%** अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच फक्त अंतिम निवडीसाठी विचार केला जाईल.

**१०.७. भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting out option) :-**

**१०.७.१** अंतिम शिफारशीपूर्वी सर्वसाधारण गुणवत्ता यादी (Merit List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१०.७.२** सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या आधारे "भरती प्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out)" हा पर्याय आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**१०.७.३** "भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे" पर्याय सादर करण्यासाठी उमेदवारांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**१०.७.४** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त "भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे" हा पर्याय लक्षात घेऊन अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**१०.७.५** पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

**१०.८ अंतिम निवड :-**

**१०.८.१** लेखी मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

**१०.८.२** अशा प्रकारे तयार केलेली निवड यादी तयार केल्यापासून ०१ महिन्याच्या आत आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, आणि ही यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण झाल्यावर किंवा चालू निवड प्रक्रियेकरीता त्याच पदासाठी अशा प्रकारची यादी प्रसिद्ध झाल्यावर, यापैकी जे नंतर घडेल तोपर्यंत कार्यान्वित राहील.

**११. प्रतिक्षा यादी :-**

**११.१** प्रस्तुत संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार विज्ञापित पदसंख्येच्या १०% एवढ्या पदांकरीता प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. सदर पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.

**११.२** प्रस्तुत संवर्गाची प्रतिक्षा यादी तयार केल्यापासून १ महिन्याच्या आत आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, आणि ही यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक वर्ष पूर्ण झाल्यावर किंवा पुढील निवड प्रक्रियेकरीता त्याच पदासाठी अशा प्रकारची यादी प्रसिद्ध झाल्यावर, यापैकी जे नंतर घडेल तोपर्यंत कार्यान्वित राहील.

**१३. खालीलपैकी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही:-**

**१३.१** न्यायिक सेवेतून किंवा शासनाच्या किंवा सांविधिक किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून सक्तीने निवृत्त करण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल किंवा न्यायिक सेवेतील किंवा शासनाच्या किंवा सांविधिक अथवा स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील कोणत्याही पदाचा परिविक्षा कालावधी पूर्ण केला नसेल **किंवा**

**१३.२** नैतिक अध:पतनाचा समावेश असणा-या गुन्हयांच्या अपराधासाठी सिध्दपराधी ठरविण्यात आले असेल किंवा उच्च न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमचे प्रतिरोधित केले असेल किंवा अपात्र ठरविले असेल अथवा ठरविण्यात आले असेल **किंवा**

**१३.३** उमेदवारीकरिता सेवाभरती प्राधिकरणावर कोणत्याही मार्गाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रभाव टाकला असेल किंवा

**१३.४** उमेदवार पुरुष असेल व त्याला एकापेक्षा जास्त हयात पत्नी असतील आणि उमेदवार स्त्री असेल तर हयात पत्नी असलेल्या पुरुषाशी स्त्रीने विवाह केला असेल किंवा

**१३.५** ज्या दांपत्याला फक्त एकच अपत्य आहे, आणि त्यानंतरच्या एकाच प्रसुतीतून जन्मास येणारी कितीही अपत्ये असली, तरी ती एकच अपत्य समजली जातील. परंतु महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ या नियमांच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २८ एप्रिल, २००५ रोजी ज्या व्यक्तिस दोनपेक्षा अधिक अपत्ये होती, आणि जोपर्यंत नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकास असलेल्या अपत्यांच्या संख्येत पुढे कोणतीही वाढ झालेली नाही तोपर्यंत ती व्यक्ती या कलमान्वये नियुक्तीस अपात्र ठरणार नाही. पुढे असेही नमूद करण्यात येते की, तसेच सदर नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत एका प्रसूतीमध्ये जन्मास आलेले एक किंवा एकपेक्षा अधिक अपत्य या कलमान्वये नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रत्यायोजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही.

**१४. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**१४.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**१४.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा.

**१४.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा.

**१४.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

१४.२ प्रस्तुत पदावर नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत राहणार आहे, याबाबतचे रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

१४.३ प्रस्तुत पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीला कोणत्याही न्यायालयात किंवा त्या न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयात सेवेत असताना सेवा समाप्ती झाल्यापासून दोन वर्षापर्यंत वकिली व्यवसाय करण्यास प्रतिरोध करण्यात येईल आणि सेवा समाप्त झाल्यापासून अशा न्यायालयांमध्ये दोन वर्षासाठी वकिली व्यवसाय करणार नाही, असे लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

१४.४ प्रस्तुत पदावरील नियुक्ती तीन वर्षाच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल.

**१५. पूर्व परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत:-**

**१५.१** अर्ज सादर करण्याचे टप्पे:-

(एक) खाते निर्माण करणे अथवा आवश्यक असल्यास खाते अद्ययावत करणे.

(दोन) विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

(तीन) परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

(चार) जिल्हा केंद्र निवड करणे.

**१५.२ विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**१५.२.१** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता अजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ. क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र | फाईल फॉर्मेट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ५ | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र (२०२६-२०२७) | PDF | ५० | ५०० |
| ६ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र (UDID card) किंवा वैश्विक ओळखपत्रासाठीचा नाव नोंदणी क्रमांक (Enrolment Number) पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ७ | मागासवर्गीय दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ८ | एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| ११ | विहित अनुभव प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १२ | बार कौन्सिल ऑफ इंडिया/महाराष्ट्र आणि गोवा अन्वये नोंद केलेल्या प्रमाणपत्राची प्रत | PDF | ५० | ५०० |

**१५.२.२** उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**१५.२.३** संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

**१५.२.४** पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

**१५.२.५** अनुभवाच्या दाव्याच्या पृष्ट्यर्थ उमेदवारांनी संबंधित संस्थेच्या नाममुद्रीत पत्रावर सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले सविस्तर व परिपूर्ण अनुभव प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. त्यामध्ये उमेदवाराचे नाव, पदाचे नाव, पदाचा तपशील, वेतनश्रेणी, अर्जात दावा केलेल्या पदावरील अनुभवाचा कालावधी व पदावरील नेमणूकीचे स्वरुप इ. स्पष्ट असणे आवश्यक आहे.

**१५.२.६** अर्जासोबत प्रमाणपत्र/कागदपत्रे सादर करण्याबाबतची कार्यपद्धत आयोगाच्या क्रमांक एमआयएस-०१२०/सी.आर.२२/२०२३/मा.तं., दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार असेल.

**१५.३ सर्वसाधारण :-**

(एक) अर्ज फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

(दोन) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

(तीन) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(चार) आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१५.४ जिल्हा केंद्र निवड :-**

(एक) अर्ज सादर करतानाच जिल्हा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे.

(दोन) जिल्हा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही

(तीन) एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

(चार) एकदा निवडलेल्या अथवा आयोगाने निश्चित केलेले जिल्हा केंद्र / परीक्षा उपकेंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

(पाच) वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्याच्याआधारे संबंधित महसुली मुख्यालयाच्या जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**१५.५ परीक्षा शुल्काचा भरणा:-**

**१५.५.१ परीक्षा शुल्क (रुपये) :**

**(एक)** अमागास/आ.दु.घ/अनाथ - रु. ३९४/-

**(दोन)** मागासवर्गीय/दिव्यांग - रु. २९४/-

**(तीन)** उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

**(चार)** परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

**१५.५.२** अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणाऱ्या 'Submit and Pay fees' या बटनावर क्लिक केल्यानंतर किंवा मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या सदराखालील अर्ज केलेल्या संवर्ग / परीक्षांच्या यादीतील 'Fees not Paid' अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात/पद/परीक्षेसमोरील ' Pay Now' या लिंकवर क्लिक करुन परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

**१५.५.३** परीक्षा शुल्काचा भरणा खालील दोन पध्दतीने करता येईल:-

**(एक) ऑनलाईन पध्दतीने** :-

(१) भारतीय स्टेट बँक तसेच प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरून आणि/अथवा खात्यातून लॉगआऊट होऊ नये.

(३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (status)लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

(४) कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे करणे शक्य न झाल्यास अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर दोन दिवसापर्यंत परीक्षाशुल्काचा भरणा ऑफलाईन पद्धतीने करण्याकरीता चलनाची प्रत घेता येईल.

**(दोन) ऑफलाईन पध्दतीने** :-चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा विकल्प निवडल्यास उपलब्ध होणारी चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत विहित अंतिम दिनांकापूर्वी परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल. तथापि, चलनाची प्रत घेणे व बँकेत शुल्क जमा करणे, यामध्ये किमान तीन तासांचा कालावधी राहील, याची दक्षता घ्यावी.

**१५.५.४** परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या/अधिसूचनेच्या अनुषंगाने विहित दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची आयोगाकडून दखल घेतली जाणार नाही.

**१५.५.५** विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**१६. प्रवेशप्रमाणपत्र** :-

**१६.१** परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mpsconline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१६.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१६.३** प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. याबाबतची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी एक सप्ताह अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१६.४** परीक्षेच्या दिनांकापूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या कार्यालयाकडे संपर्क साधावा.

**१६.५** परीक्षेच्यावेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१६.६** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **रंगीत प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१६.७** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील **"उमेदवारांकरीता माहिती"** विभागातील **" सूचना"** अंतर्गत **"सर्वसाधारण सूचना"** तसेच **"परीक्षा"** या सदराखालील **"परीक्षा योजना"** विभागातील **"दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१८.** दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०२४ च्या आयोजनाच्या दिनांकास अन्य संस्थेची परीक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे; याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक राहील.

**१९.** पदभरतीसंदर्भात काही अनुचित प्रकार घडल्यास महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कार्यवाही करण्यात येईल.

**२०.** आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**२१.** सदर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सं. पां. देशमुख**
**उप सचिव, जाहिरात**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**ठिकाण : नवी मुंबई**
**दिनांक : ३० एप्रिल, २०२६**

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्यावेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.